“डस्टर”या बाबीची दर निश्चितीबाबत.

RPAD

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक. उसं/भांखस/डस्टर/दरनिश्चिती/२०२१-२२/(१२)/२०२१/** क्री- ९५७७

**दिनांक:-** 18 AUG 2021

**वाचा :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस - २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग- III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.०३/०८/२०२१ रोजीचे इतिवृत्त.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार **“डस्टर”** या बाबीची **सन २०२१-२२** या वर्षासाठी दरनिश्चिति करण्यासाठी **मे. दि. एन.एस.डी. ब्लाईंड इंडस्ट्रियल होम, वरळी, मुंबई** या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या, भांडार खरेदी समितीने दि.०३/०८/२०२१ रोजीच्या बैठकीत **“डस्टर”** या बाबीचे सन २०२०-२१ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**“डस्टर”** बाबीचे निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | दरनिश्चिती बाब | कच्चा माल | सन २०२१-२२ करीता निश्चित केलेले दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | **कॉटन डस्टर,**<br>७५सें. मी. X ७५ सें. मी.<br>वजन १२० ग्रॅम<br>(प्रत्येकी नग) | वार्प २/२० कॉटन(६०ग्रॅम)<br>उभे धागे- ३६ प्रती इंच,<br>वेप्ट ६ इंच (६५ ग्रॅम)<br>आडवे धागे -२४ प्रती इंच,<br>धागा ४ मी. (६० नंबर) | प्रति नग दर रुपये ३९.००<br>मुंबई मध्ये मोफत पोहोच.<br><br>प्रति नग दर रुपये ४१.००<br>मुंबई बाहेर संपूर्ण महाराष्ट्रात मोफत पोहोच. |

सदर दरनिश्चितीची विधिग्राह्यता **दि.३०/०४/२०२२** पर्यंत राहील. डस्टर या बाबीसाठी जर वस्तू व सेवा कर (GST) लागू असेल, तर या बाबींकरीता GST हा वर नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

संस्थेनी स्वत: उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये. संस्थेच्या अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून कमीत कमी ०८ आठवड्याच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील. तसेच शासकीय कार्यालयास केलेल्या पुरवठयाबाबतचा अहवाल दर महा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर कामाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तु पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व कामे पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३०दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवड्या प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालाची/ वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकते नुसार करावी.

वरील संस्थेने शासकीय कार्यालयास केलेल्या डस्टर पुरवठयाबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) मे. दि. एन.एस. डी. ब्लाईंड इंडस्ट्रियल होम, बी. डी. डी. चाळ क्र.५२, वरळी, मुंबई- ४०० ०१८.
२) निवड नस्ती.